नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २४/०१/२०२५ (शुक्रवार) दुपार

# जिल्हा व्याघ्र समिती ची बैठक कऱ्हारंडा ,उमरेड येथे पडली पार

दिनांक २४/०१/२०२५ रोजी जिल्हा व्याघ्र समिती ची बैठक मा.श्री हर्ष ए. पोद्दार,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांच्या अध्यक्षेखाली कऱ्हारंडा फॉरेस्ट गेट, उमरेड येथे पार पाडली. सदर बैठकीत श्री भरतसिंग हाडा, उपवनसंरक्षक,नागपुर वन विभाग, श्री प्रभुनाथ शुक्ल, उपवनसंरक्षक ,पेंच व्याघ्र प्रकल्प , श्री पि.जी कोडापे, विभागिय वन अधिकारी व सचिव नागपुर ,श्री के. यु बिरासीस, सहा वनसंरक्षक , श्री नागुलवार सहा वनसंरक्षक, श्रीमती वृष्टी जैन , सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय अधिकारी ,उमरेड विभाग,तसेच NHAI ,PWD,MSEDCL चे अधिकारी , परिक्षेत्र वन अधिकारी रामटेक, नागपुर, कोंढाळी, उमरेड, बोरी, हिंगणा, नरखेड, देवलापार,काटोल, कळमेश्वर आणि प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन उमरेड, भिवापुर, खापा, वेलतुर, कुही, देवलापार, पारशिवणी, कळमेश्वर,काटोल बैठकीत हजर होते. सदर बैठकीत मा. श्री हर्ष ए. पोद्दार,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांनी खालील प्रमाणे सुचना दिल्या तसेच अनेक मुददयांवर चर्चा करण्यात आली.

- सदर बैठकीत वाघांचे होणारे रस्ते अपघात,तसेच अवैध विज रोजी मुळे करंट लागुन वाघांचे मृत्यु टाळण्याची MSEDCL विभाग,फॉरेस्ट विभाग ,पोलीस विभाग यांनी सलग १ महीना संयुक्त पेट्रोलिंग बाबत सुचना दिल्या. अवैध विज रोजी साठी ड्रोन द्वारे लक्ष ठेवण्यात यावे याबाबत सुचना देण्यात आल्या.
- जंगल सफारी मध्ये मोबाईल फोन नेण्यासाठी प्रतिबंध घालावा याबाबत चर्चा करण्यात आली. त्यासाठी प्रत्येक गेटवर मोबाईल प्रतिबंधीबाबत सुचना बोर्ड लावण्यात यावे अशा सुचना देण्यात आल्या.
- जंगल सफारी वाहनावर डॅशबोर्ड वर कॅमेरे लवकारात लवकर बसविण्याबाबत सुचना देण्यात आल्या.
- सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण रस्ता बांधकाम विभागाच्या अधिकारी दाट जंगले साफ करण्याबाबत सुचना देण्यात आल्या.
- उमरेड कऱ्हारंडा अभयारण्यात ३१/१२/२०२४ रोजी पर्यटकांनी वाघिणीचा रस्ता रोकला होता या सारख्या घटना या पुढे घडणार नाही याबाबत उपयोजना करण्यात याव्या अशा सुचना देण्यात आल्या.
- NHAI विभागाने योग्य ठिकाणी प्राण्यांच्या वावरांबाबत wild life साईनबोर्ड लावावेत.त्याबाबत तात्काळ अंमल बाजावणी करवी
- ज्या ज्या ठिकाणी वन्य जीव अपघात झाले त्या ठिकाणी पोलीस स्टेशन प्रभारी अधिकरी यांनी भेट दयावी.
- तोतला डोह धरणांवर होणाऱ्या मासेमारी संबधात असणाऱ्या वादाबाबत मा. पोलीस अधिक्षक पांढुर्णा यांच्याशी चर्चा करण्याबाबत चर्चा करण्यात आली.



जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे कोंढाळी :– दि. २३/०१/२०२५ रोजी कोंढाळी पोलिसांना मुखबीर द्वारे खात्रीशीर खबर मिळाली की, मौजा वर्धा रोड कोंढाळी येथे ट्रक क्र. एम एच ४० सी.टी २९५४ मध्ये अवैद्यरित्या कत्तलीकरीता जनावरे कोंबून वाहतूक करीत आहे. अशा माहिती वरून मौजा वर्धा रोड कोंढाळी येथे नाकाबंदी केली असता ट्रक क्र. एम एच ४० सी.टी २९५४ चा चालक **आरोपी नामे– आवेश यासीन अली वय २४ वर्ष रा.कटंगी जि बालाघाट ह.मु काटोल** याने आपल्या ताब्यातील ट्रक क्र. एम एच ४० सी.टी २९५४ वाहनात क्षमतेपेक्षा जास्त गोवंश भरून प्राण्यांना निर्दयपणे वागणूक देवून प्राण्यांना वेदना किंवा यातना होईल अशा रितीने आपले वाहनात भरून वाहतुक करतांना तसेच प्राण्यांना घेवून जात असलेल्या वाहनात हालचाल करता येणार नाही अशा पदधतीने आपले ताब्यातील वाहनात १२ नग गोवंश (बैल) वाहतुक करतांना मिळून आल्याने आरोपी याचे ताब्यातुन ट्रक क्र. एम एच ४० सी.टी २९५४ किंमती १०,००,०००/–रू. मध्ये १२ नग गोवंश (बैल) किंमती १,३०,००० रू चा माल असा एकुण ११,३०,०००/–रू. चा माल जप्त केला.

सदर प्रकरणात पोलिसांनी **चालक आरोपी नामे– आवेश यासीन अली वय २४ वर्ष रा.कटंगी जि बालाघाट ह.मु काटोल** याचे विरुद्ध कलम ११(१)(ड), (घ) प्राण्यांना कुरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० सहकलम ८३ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद केला असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

# अवैधरीत्या गावठी मोहाफुल दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोस्टे सावनेरः—** दिनांक २४/०१/२०२५ रोजी पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टाफ यांना मुखबिरदवारे विश्वनीय माहिति मिळाली कि बॅक ऑफ इंडीया बॅकेसमोर तेलकामठी येथे मोपेड गाडी क्र. एम एच—४०/बी टी — ०४७९ वाहनामध्ये अवैद्यरित्या गावठी मोहाफुल दारूची वाहतुक करीत आहे. अशा माहिती वरून स्टाफ यांनी नमुद घटनास्थळी नाकाबंदी केली असता **आरोपी अक्षय हिरामन मारवाडी, वय २० वर्ष, रा. पारधी बेडा** हा त्याचे ताब्यातील मोपेड गाडी क्र. एम एच—४०/बी टी — ०४७९ वरील पांढऱ्या रंगाचे बोरीची झडती घेतली असता ७६ लीटर गावठी मोहाफुल दारू बाळगुन वाहतूक करताना मिळुन आल्याने त्याचेकडुन ७६ लीटर गावठी मोहाफुल दारू किंमती ७६००/—रू. व मोपेड गाडी क्र. एम एच—४०/बी टी — ०४७९ किंमती ३०,०००/—रू. असा एकुण ३७६००/—रू चा मुद्देमाल ताब्यात घेवुन जप्त केला. नमुद आरोपी याचे विरूध्द कलम ६५ (अ), (ई) म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**